# जनावरांचे आरोग्य व्यवस्थापनावर कार्यशाळा

**गोंदिया (प्रतिनिधी) :** जनावरांचे आरोग्य राखण्यासाठी त्यांचे वेळोवेळी तसेच आवश्यक ते लसीकरण केले पाहिजे, गोठ्यातील माशा व गोचीड नियंत्रणासाठी गोठ्याची स्वच्छता राखावी, असे प्रतिपादन गोंदिया केव्हीकेचे कार्यक्रम समन्वयक डॉ. एन. एस. देशमुख यांनी केले.

ग्रामपंचायत भडंगा येथे जनावरांचे आरोग्य व्यवस्थापन या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. डॉ. देशमुख म्हणाले, की जनावरांच्या आरोग्यात स्वच्छ परिसर व गोठा हा घटक महत्त्वाचा ठरतो. केव्हीकेचे तज्ज्ञ आर. डी. चव्हाण यांनी खोडकीड नियंत्रणाविषयी माहिती दिली. खोड कीड नियंत्रणासाठी विद्यापीठाने शिफारस केलेल्या कीटकनाशकाची फवारणी करावी, असे आवाहन त्यांनी केले. गोंदिया कृषी विज्ञान केंद्र व पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त सहकार्याने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होते. या वेळी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने ४०० जनावरांची आरोग्य तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. कार्यक्रमाला डॉ. आर. बी. सहारे, डॉ. गजभीये, डॉ. एस. पी. गायगवळी उपस्थित होते.